(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

२०२३ एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. ५१२

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

(न्यायमूर्ती अभय एस. ओक आणि न्यायमूर्ती राजेश बिंदल, यांचे समोर)

दिवाणी अपील क्रमांक २९५०/२०२३

बेळगाव नगर विकास प्राधिकरण .... अपीलकर्ता/याचिकाकर्ता ;

विरुध्द

ध्रुव आणि इतर एक .... उत्तरवादी

सह

दिवाणी अपील क्रमांक २९५१/२०२३

दिवाणी अपील क्रमांक २९५२/२०२३

दिवाणी अपील क्रमांक २९५०/२०२३ , दिवाणी अपील क्रमांक २९५१/२०२३ आणि दिवाणी अपील क्रमांक २९५२/२०२३

न्यायनिर्णित - २८ एप्रिल २०२३

या प्रकरणात हजर असलेले वकीलःअपीलकर्त्यांसाठी श्रीमती अनुराधा मुटाटकर, अभिलेखावरील अधिवक्ता (AoR). उत्तरवादींसाठी श्री. अनिल कुमार, अभिलेखावरील अधिवक्ता(AoR). .

न्यायनिर्णय **न्यायमूर्ती राजेश बिंदल** यांनी दिला - हा आदेश दिवाणी अपील क्रमांक २९५०-२९५२ / २०२३ या अपीलांच्या गटाला निकाली काढेल. उच्च न्यायालयाच्या सामान न्यायनिर्णयाद्वारे जी पाच नियमित द्वितीय अपील निकाली काढण्यात आली होती, त्यावर आक्षेप घेण्यात आला आहे.

२. वरील दोन अपीलांच्या संदर्भात उच्च न्यायालयाच्या सामान निर्णयाला आव्हान देणारी इतर कोणतीही अपील या न्यायालयात प्रलंबित आहे. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आणून दिले नाही की या न्यायालयासमोर सूचीबद्ध केलेल्या प्रकरणांवरून हे स्पष्ट होते की उच्च न्यायालयाच्या केवळ नियमित द्वितीय अपील क्रमांक ७५९ , ७६० आणि ८६४/२००८ मधील न्यायनिर्णयाला आव्हानीत केले आहे आणि नियमित द्वितीय अपील क्रमांक ७५८ व ८६३ मध्ये कोणतेही अपील दाखल केलेले नाही.

प्रकरणामधील तथ्ये :________

३ . सध्याचे अपील आणि वैयक्तिक प्रकरणांमधील संबंधित भूखंड क्रमांकांशी संबंधित तपशील खाली नमूद केले आहेतः

अ. क्र.	दिवाणी अपील क्र.	नि. दु.अ. क्र.	नियमित अपील क्र.	मुळ दावा क्र.	भुखंड क्र.
१.	२९५०/२०२३	७६०/२००८	१५४/२००६	५२७/२००३	५५०
२.	२९५१/२०२३	८६४/२००८	१४४/२००६	५२५/२००३	२११
३.	२९५२/२०२३	७५९/२००८	१४६/२००६	५२६/२००३	५५२

४. सामान कायदेविषयक मुद्दे समाविष्ट असल्याने, दिवाणी अपील क्रमांक २९५०/२०२३ मधून तथ्ये सारभूत केली गेली आहेत. या प्रकरणाची निर्विवाद तथ्ये अशी आहेत की, सध्याच्या अपीलात उत्तरवादी/वादी निवासी जागेचे वाटप करण्यासाठी

अपीलकर्ता/उत्तरवादी क्रमांक २ (बेळगाव अर्बन डेव्हलपमेन्ट अ‍ॅथॉरिटी, थोडक्यात 'BUDA') कडे निवासी भूखंडासाठी अर्ज केला. अपीलकर्त्याने वादीला जागेचे केले. वाटणीपत्र १२.११.१९९० रोजी देण्यात आले होते. जागेचा ताबा वादीकडे सोपवण्यात आला. त्यानंतर, वादी/उत्तरवादीच्या बाजूने १०.०५.१९९१ रोजी भाडेपट्टी-तथा-विक्री करार निष्पादित करण्यात आला .

५. उत्तरवादींकडून भूखंडासाठी अतिरिक्त किंमतीची मागणी करणे करण्यात आल्याने दावा दाखल करण्यात आला. संपरीक्षा न्यायालयाने या दाव्यात हुकूमनामा पारित केला. संपरीक्षा न्यायलयाचा निर्णय आणि हुकूमनामा अपिलामध्ये फिरविण्यात आला. अपीलकर्त्याने दाखल केलेल्या दुसऱ्या अपीलत, कनिष्ठ अपिलीय न्यायालयाचा निर्णय आणि हुकूमनामा फिरविण्यात आला. त्याच निर्णयाला या न्यायालयासमोर आव्हानीत केलेले आहे. उच्च न्यायालयाने, द्वितीय अपिलामध्ये, अपीलकर्त्याला नियमित द्वितीय अपील क्रमांक ८६४, ७५८ आणि ८६३/२००८ मध्ये उत्तरवादीच्या नावे विक्री दस्तऐवज निष्पादित आणण्याचे निर्देश दिले तसेच नियमित द्वितीय अपील क्रमांक ७५९ आणि ७६०/२००८ मधील उत्तरवादींनी भरलेली अतिरिक्त किंमत परतवा (Returns) त्यांना परत करण्याचे निर्देश दिले.

युक्तिवादः

६. अपीलकर्त्या तर्फे हजर असलेले विद्वान वरिष्ठ वकील श्री. एस. एन. भट यांनी असे प्रतिपादन केले की १२.११.१९९० च्या वाटप पत्राद्वारे प्रतिवादींना भूखंडांचे वाटप करण्यात आले होते. भूखंडाची किंमत तात्पुरती असल्याचे वाटप पत्रातील पोटकलामात नमूद केले आहे. त्यामुळे अतिरिक्त किंमतीची मागणी करणे बेकायदेशीर असल्याचे म्हणता येणार नाही. हे उत्तरवादी - वादी यांना वाटप केलेल्या भूखंड निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीच्या

मावेजा/भरपाईत वाढ करण्याच्या कारणास्तव होते. त्यांनी पुढे दिनांक १०.०५.१९९१ रोजी उत्तरवादींच्या नावे निष्पादित केलेल्या भाडेपट्टी तथा विक्री करारांचा संदर्भ दिला, ज्यात अशा प्रकारच्या कोणत्याही विशिष्ट रकमेचा उल्लेख मोबदला म्हणून केलेला नाही. त्यात फक्त असे नमूद केले आहे की किंमतीबाबत वाटाघाटी करण्यात आल्या होत्या आणि पूर्ण किंमत देईपर्यंत उत्तरवादींना भूखंडाचा भोगवटादार राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. भाडेपट्टी तथा विक्री करारामध्ये पुढे अशी तरतूद केली आहे की त्यातील पक्षांनी कर्नाटक इम्प्रुव्हमेंट बोर्ड रुल,१९७६ (कर्नाटक सुधार मंडळ नियम, १९७६) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्यास सहमती दर्शविली आहे. शिमला विकास प्राधिकरण विरुद्ध आशा राणी या खटल्यातील या न्यायालयाच्या निकालावर भर देताना असे प्रतिपादन करण्यात आले की, या न्यायालयाने अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या नुकसानभरपाईत वाढ केल्यामुळे शिमला विकास प्राधिकरणाला वाटपदारांकडून अतिरिक्त रक्कम आकारण्याची परवानगी दिली होती.

७. तामिळनाडू हाऊसिंग बोर्ड विरुद्ध सी शोर अपार्टमेंट्स ओनर्स वेल्फेअर असोसिएशन प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर देखील भर देत प्रतिपादन करण्यात आले आहे की, नमूद केलेली किंमत तात्पुरती असेल तर अतिरिक्त रकमेची मागणी केली जाऊ शकते.

८. सध्याच्या प्रकरणात अतिरिक्त किंमतीची मागणी पूर्णपणे न्याय्य आहे कारण ती भूखंड तयार करण्यासाठी वापरल्या गेलेल्या जमिनीच्या अधिग्रहणासाठीची नुकसानभरपाई न्यायालयाने वाढवल्यामुळे होती. पुढे असे सादर करण्यात आले आहे की उच्च न्यायालयासमोर असलेले पाच वाटपदार वगळता इतर सर्वांनी त्यांच्याकडून वाढीव मावेजापोटी मागणी केलेली अतिरिक्त किंमत जमा केली होती.

९. दुसरीकडे, उत्तरवादी -वादी यांचे विद्वान वकील सादर करतात की वाटपपत्र किंवा भाडेपट्टी तथा विक्री करारामध्ये असे कोणतेही कलम नाही ज्याच्या संदर्भात अपीलकर्ता आकारातील तफावत वगळता वाटपदारांकडून अतिरिक्त किंमतीची मागणी करू शकेल. जर वाटप केलेल्या भूखंडाचा आकार अंतिमत: वाटप केलेल्या भुखंडापेक्षा वेगळा असढल्यास वाटणीपत्राच्या कलम 5 केवळ अपीलकर्त्याला किंमत पुन्हा ठरवण्याचा पर्याय देते. इतर कोणत्याही आधारावर भागधारकाकडून अतिरिक्त किंमतीची मागणी करण्यासाठी, भागवाटप पत्रात विशिष्ट कलम असणे आवश्यक आहे अन्यथा नमूद केलेली किंमत अंतिम असेल. भाडेपट्टी तथा विक्री करारामध्ये नमूद केलेले कलम देखील अपीलकर्त्याच्या बचावासाठी येऊ शकत नाही कारण तो विक्री करणारा आणि खरेदी करणारा यांच्यात झालेलया वाटाघाटीतील किंमतीबद्दल आहे. वाटपपत्रात याचा स्पष्टपणे उल्लेख आहे अन्यथा विक्रीच्या विचारांच्या संदर्भात करार असंबद्ध्‌ध होईल.

<u>चर्चा :</u>

१०. पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला आणि संबंधित संदर्भित अभिलेखाचे अवलोकन केले.

११. अपीलकर्त्याने उल्लेख केल्याप्रमाणे वाटपपत्र आणि भाडेपट्टी तथा विक्री कराराचे संबंधित कलमे खाली दिली आहेतः

> **'' वाटपपत्र :**
>
> '' **कलम ५ :** नोंदवलेली आकारमाने अंदाजे आहेत; ताबा देताना पडताळणी करावयाच्या अधीन असून वाटपदारांना प्रत्यक्ष मोजमापांनुसार त्या प्रमाणात वाढीव किंमत द्यावी लागेल.

या जागेचे मूल्य रु. ५०,०००/- + १०% टक्के पाणी पुरवठा शुल्कात वाढ म्हणजे रु. ५,००० /- तात्पुरते = रु. ५५,०००/-.''

'' भाडेपट्टी तथा विक्री करार :

“ज्याअर्थी, भाडेपट्टीकार/खरेदीकरणार आणि भाडेपट्टीदार/ विक्रीकरणार यांच्यात भाडेपट्टीकार/ खरेदीकरणार यांस भाडेपट्टीदार म्हणून परिशिशिष्टाधीन मालमत्तेचा ताबा घेण्याची, भाडेपट्टीदार/विक्रीकरणार ठरवतील त्या किंमतीचे पूर्ण प्रदान होईपर्यतण् परवानगी देण्याबाबत वाटाघाटी झाल्या आहेत. ते खालीलप्रमाणे-”.

१२. या न्यायालयासमोरील ईश्वर दास नास्सा विरुद्ध हरियाणा राज्य या प्रकरणात अशाच प्रकारचा मुद्दा विचाराधीन होता. हरियाणा गृहनिर्माण मंडळाने वाटपग्राहीच्या बाजूने भाडे-खरेदी करार निष्पादित केले. खरेदी-विक्री भाडेकरारात समाविष्ट असलेले कलम, निकालाच्या परिच्छेद क्रमांक 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे, खाली दिले आहे:

२ . (डब्लू) भाडयाच्या जागेच्या बांधकामासाठीची अंतिम देयके मिळाल्यानंतर किंवा जमीनविषयक निवाडा किंवा लवाद कार्यवाहीचा परिणाम म्हणून किंवा कोणत्याही कारणामुळे जमिनीच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे, मंडळाला आधीच निर्दिष्ट केलेल्या किंमतीत सुधारणा करणे आवश्यक वाटत असेल, तर ते असे करू शकेल आणि भाडेकरूने देय असलेली अंतिम किंमत निश्चित करू शकेल, जो या निर्णयाला बांधील असेल आणि अशा प्रकारे निर्धारित केलेली अंतिम किंमत आणि त्याने केलेल्या प्रदानासह ज्यात, प्रदानासहित देय असलेल्या फरकाची रक्कम असल्यास देईल, परंतु वाटपाच्या तारखेपासून ७ वर्षांनंतर किंमतीत कोणताही बदल केला जाणार नाही.

१३. सुमारे १० वर्षांनंतर मालमत्ता व्यवस्थापक,हरियाणा गृहनिर्माण मंडळ (इस्टेट मॅनेजर, हाऊसिंग बोर्ड हरियाणा), सोनीपत यांनी, ज्या जमिनीवर बांधकाम करण्यात आले होते

त्या जमिनीशी संबंधित वाढीव मावेज्यामुळे अतिरिक्त किंमत देण्याची मागणी करणारे निर्देश दिले होते. उपरोक्त कलमाचा अर्थ लावताना, या न्यायालयाने असे म्हटले की भाडे-खरेदीच्या भाडेकरारात दिलेल्या अटींनुसार, भाड्याच्या जागेची किंमत बांधकामाच्या खर्चामुळे किंवा भूसंपादनासाठी मुआवजाच्या मावेजामुळे वाढविली जाऊ शकते. तथापि, या कलमाचा पुढे अर्थ लावताना असे म्हटले गेले की वाटपग्राहींकडून केलेली मागणी न्याय्य नाही कारण या कलमातच अशी तरतूद आहे की अशी मागणी वाटपाच्या सात वर्षांच्या आत केली जाऊ शकते.त्यातील संबंधित परिच्छेद खाली दिले आहेत :

"१०. वाटपपपत्र आणि खरेदी-विक्री(hire-purchase) भाडेकरारात कलम 2 (डब्ल्यू) चे संयुक्त वाचन स्पष्ट करते की, जे प्रत्येक वाटपग्रहींनी निष्पादीत करणे आवश्यक आहे, वाटपपत्रात निर्दिष्ट केलेल्या भाड्याच्या जागेची किंमत तात्पुरती आहे आणि बांधकाम खर्चाचे प्रतिनिधित्व करणारी अंतिम देयके मिळाल्यानंतर मंडळ किंमतीत सुधारणा करू शकते किंवा जर न्यायालयाच्या आदेशाचा किंवा लवादाने दिलेल्या निर्णयाचा परिणाम म्हणून भाड्याच्या जागेच्या बांधकामासाठी वापरल्या जाणऱ्या जमिनीसाठी जास्त किंमत देणे आवश्यक असेल. दोन्ही बाबतीत, वाटपग्राही अतिरिक्त रक्कम देण्यास बांधील असतो, जी भाड्याच्या जागाची अंतिम किंमत दर्शवते. जर अशाच इतर कोणत्याही कारणास्तव जमिनीची किंमत वाढवली गेली तर मंडळ देखील किंमतीत सुधारणा करू शकते आणि वाटपदारांना/वाटपग्रहींना अतिरिक्त किंमत देण्यास सांगू शकते.दिलेल्या प्रकरणात, मंडळ तात्पुरत्या किंमतीत एकापेक्षा जास्त वेळा सुधारणा करू शकते आणि वाटपदार/वाटपग्राही अतिरिक्त खर्चाचा भार वाटून घेण्यास बांधील असतात.

११-१२. x x x x x x x x x x x x

१३ . दुर्दैवाने, विद्वान एकल न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या द्विसदसीय खंडपीठाने खरेदी विक्री भाडेकरारात (hire-purchase) कलम २ (डब्ल्यू) मध्ये असलेल्या प्रतिबंधास पुरेसे महत्त्व दिले नाही आणि कोणत्याही वेळी किंमतीत सुधारणा करण्याचा अधिकार मंडळाकडे आहे असे गृहीत धरून अतिरिक्त किंमतीच्या मागणीला अपीलकर्त्यांनी दिलेले आव्हान नाकारले. "किंवा कोणत्याही कारणासाठी जमिनीची किंमत वाढवणे" या अभिव्यक्तीनंतर, "भाडेतत्त्वावरील जागेच्या बांधकामासाठी अंतिम देयकाची पावती किंवा जमीन अधिनिर्णय किंवा लवादाच्या कार्यवाहीचा परिणाम " या अभिव्यक्तीचा वापर केल्याने असे दिसून येते की, नियम तयार करताना , मंडळाने सर्व शक्यता लक्षात घेतल्या त्या तरीही मंडळास ७ वर्षानंतर किंमतीत बदल करण्यास बंदी आणणे मंडळास योग्य वाटले. ज्यामुळे भाडेतत्त्वावरील जागेच्या बांधकामासाठी उपलब्ध केलेल्या जमिनीच्या किमतीत वाढ होऊ शकते आणि त्यामुळे, एकदा जमीनमालकांना जास्त मुआवजा दिल्यामुळे जमिनीची किंमत वाढली की मंडळ वाटपदारांकडून/वाटपग्राहींकडून अतिरिक्त किंमत मागणी करण्यास पात्र आहे या आधारावर एकल न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या द्विसदसीय खंडपीठाने रिट याचिका आणि रिट अपीलांवर निर्णय घेणे योग्य नव्हते.

(भर दिला आहे)

१४. प्रीता सिंग (कुमारी) विरुद्ध हरियाणा नगर विकास प्राधिकरण या प्रकरणातही या न्यायालयाने या मुद्द्याचा विचार केला होता. उपरोक्त प्रकरणातील आव्हान हे जमिनीच्या वाढीव मावेज्यामुळे अतिरिक्त किंमतीची मागणी करणेबाबतही होते. पंजाब अर्बन इस्टेट जागेची

(साइट्सची विक्री) नियम, १९६५ च्या कलम २ (एक) चा संदर्भ देत, जे "अतिरिक्त किंमत" परिभाषित करते, कारण वाटप उपरोक्त नियमांनुसार होते, भूसंपादनासाठी वाढीव मावेज्यामुळे ज्याचा वापर भूखंड तयार करण्यात केला गेला, अतिरिक्त किंमतीची मागणी करणे या न्यायालयाने कायम ठेवली.

१५. तामिळनाडू गृहनिर्माण मंडळाच्या प्रकरणात (उपरोक्त) , करारातील कलम १८ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की सदनिकांच्या बांधकामाच्या एकूण परिव्ययाला अंतिम रूप दिल्यानंतर, न्यायालयाने मावेजा वाढवण्याच्या संदर्भात जमिनीचे मूल्य वाढवल्यास, नियतभागी/वाटपग्राही हा फरक भरण्यास जबाबदार असेल. उपरोक्त निर्णयात संदर्भित संबंधित खंड खाली दिला आहे :

"१९. पक्षांमध्ये सहमती झालेल्या आणि सर्व वाटपग्राहींनी स्वाक्षरी केलेल्या कराराचा खंड १८ अत्यंत महत्त्वाचा आहे आणि त्यात असे म्हटले आहेः

''१८. दोन्ही पक्षांमध्ये स्पष्टपणे सहमती आहे की, सदनिकांच्या बांधकामाची एकूण परिव्यय आणि जमीनीचे मूल्य न्यायाधिकरण आणि न्यायालयांनी जाहीर केलेल्या नुकसानभरपाईच्या निर्णयानुसार निश्चित केल्यानंतर, खरेदीदार खरेदी दस्तऐवजाच्या नोंदणीपूर्वी मागणीनुसार विक्रेत्याला वरील कलम २ नुसार खरेदीदाराने आधीच दिलेली रक्कम आणि शेवटी अध्यक्ष, विक्रेत्याने निश्चित केलेल्या फरकाच्या रकमेचे प्रदार करील.''

१६ . वाटणीपत्र किंवा पक्षांमध्ये स्वाक्षरी केलेल्या भाडेपट्टी तथा विक्री करारात असा कोणताही खंड नाही.

१७. अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने उद्धृत केलेल्या निकालाकडे येताना शिमला विकास प्राधिकरणाच्या प्रकरणात (उपरोक्त), सदनिकेचे वाटप 'वित्त सहाय्य योजने' (सेल्फ फायनान्स स्किम) स्किम) अंतर्गत करण्यात आले होते. कळवलेली किंमत तात्पुरती होती.पहिली मागणी बांधकाम खर्चात वाढ झाल्यामुळे आणि दुसरी मागणी सदनिका बांधण्यासाठी वापरण्यात आलेल्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात वाढ झाल्यामुळे करण्यात आली होती. या न्यायालयाने असे म्हटले आहे की खासगी मालकाची जमीन स्वयं वित्त योजना सदनिकांच्या बांधकामासाठी अधिग्रहित करण्यात आली होती, त्यामुळे जमीन संपादनामुळे वाढीव खर्च भरण्यास वटपग्राही बांधील आहेत. याव्यतिरिक्त, वाटपदारांना/वाटपग्राहींना बांधकामाच्या खर्चातील वाढीचा बोजा देखील सहन करावा लागतो.

१८. वाटपग्राही आणि शिमला विकास प्राधिकरण यांच्यात झालेल्या खरेदी-विक्री भाडेकरारातील वाटणीपत्राच्या संबंधित कलम या न्यायालयाने पारित केलेल्या उपरोक्त आदेशात काढले गेले नाही. तथापि, आम्ही त्या प्रकरणात कागदपत्रांच्या संकलनचे (पेपर बुकचे) अवलोकन केले आहे. दिनांक १४.०७.१९९५ चे वाटप पत्र जे उत्तरवादीच्या बाजूने आहे, त्यात या न्यायालयाच्या निर्णयानुसार वाढीव भरपाई देण्यासंबंधीचे विशिष्ट कलम आहे. संबंधित कलम खाली दिले आहे :

'' वाढीव मावेजा रक्कम न्यायालयाच्या निर्णयानुसार देय असेल. ३०, ७८०/-"

१९. वाटपग्रहींनी वाढीव मावेजा भरण्यासाठी विशेषतः तरतूद केलेल्या करारातील उपरोक्त कलमाच्या संदर्भात ही मागणी या न्यायालयाने कायम ठेवली.

२०. वाटपपत्राच्या कलम- ५ चे अवलोकन केल्यास असे दिसून येते की भूखंडाच्या आकारात बदल झाल्यास भूखंडाची किंमत बदलण्याचा पर्याय देण्यात आला आहे.

संपूर्ण कलमातील कोणताही एक भाग पृथकपणे न वाचता कलमचे संपूर्ण वाचन केले पाहिजे. भूखंड पाडण्यासाठी केलेल्या जमिनीच्या संपादनामुळे मावेजा वाढल्याने , विशेषतः सध्याच्या अपीलांमध्ये उपस्थित केलेल्या इतर कोणत्याही घटकामुळे अतिरिक्त किंमतीच्या मागणी बद्दल हे कलम चर्चा करत नाही .

२१. भाडेपट्टी तथा विक्री करारातील कलमे देखील अपीलकर्त्याच्या बचावासाठी येत नाहीत कारण त्यात विक्रेता आणि खरीदीकर्ता यांच्यातील वाटाघाटीच्या किंमतीबद्दल भाष्य केले जाते. या प्रकरणातील विक्रेता हा अपीलकर्ता आहे आणि खरेदीदार हा उत्तरवादी आहे . भाडेपट्टी/ विक्री करारामध्ये अशा प्रकारे विक्रीचा विचार नमूद केलेला नाही, तथापि, पक्षांमध्ये वाटाघाटीनुसार किंमतीचा उल्लेख वाटप पत्रात स्पष्टपणे नमूद केलेला आहे आणि तो भाडेपट्टी/ विक्री कराराचा भाग म्हणून वाचला पाहिजे.

२२. वर नमूद केलेल्या कारणांमुळे, आम्हाला अपीलांमध्ये कोणतीही तथ्य आढळत नाही. ते फेटाळण्यात आले आहे. तथापि, आम्ही हे स्पष्ट करतो की जर रक्कम जमा केलेल्या इतर कोणत्याही वाटपग्राहीने आता कोणताही याचिका दाखल केली असल्यास विलंब आणि तडजोड आणि मूकसंमतीची तत्त्वे (Principles of acquiescence) लक्षात घेऊन त्याचा विचार केला जाईल.

____

[१] (१९९६) ८ एससीसी ४८७
[२] (२००८) ३ एससीसी २१
[३] (२०१२) १ एससीसी ७५३
[४] (१९९६) ८ एससीसी ७५६

अस्वीकरण: कोणतीही चूक किंवा कर्तव्यच्युती टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असताना, हे प्रकरण/शीर्षलेख/निर्णय/कायदा/नियम/नियमन/परिपत्रक/अधिसूचना या अटीवर प्रसिद्ध केले जात आहे आणि या प्रकरण/शीर्षलेख /निर्णय /कायदा /नियम /नियमन /परिपत्रक/अधिसूचनेच्या चुका किंवा कर्तव्यच्युती या आधारे केलेली कोणतीही कारवाई किंवा दिलेला सल्ला किंवा स्वीकार यासाठी प्रकाशक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. सर्व विवाद केवळ लखनौमधील न्यायालये, न्यायाधिकरणे आणि मंचांच्या अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील. या मजकुराची सत्यता मूळ स्त्रोताकडून पडताळण्यात यावी.

*****

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****